महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,
कामगार विभाग,३रा मजला,
प्रकाशगड, बांद्रा (पू), मुंबई.
संदर्भ क्र. कामगार/अ/२८२५९
दिनांक : २५/०८/२००६

परिपत्रक

विषय : मृत कर्मचा-यांच्या अवलंबित वारसदारांना रोजंदारीवर काम देण्याबाबत.

****

व्यवस्थापकीय संचालक (महावितरण) यांच्या मंजुरीनुसार सर्व क्षेत्रीय कार्यालयांना कळविण्यात येते की, 'अवलंबित' या संज्ञा / व्याख्यांतर्गत मयत कर्मचा-यांचे कायदेशीर वारसदार मासिक द्रव्य लाभ घेत असतील किंवा त्याचा मासिक द्रव्य लाभाचा प्रस्ताव अनिर्णित असल्यास आणि म.रा.वि. मंडळ कर्मचारी सेवा प्रवेश विनियमातील तरतुदीनुसार शैक्षणिक अर्हता धारण करीत असतील अशा अवलंबितांना बाह्यकंत्राटी (आऊट सोर्सिंग) पध्दतीने कामे देताना प्राधान्य देण्यात यावे.

मृत कर्मचा-यांच्या अवलंबितांना किमान वेतन दराने रोजंदारीवर काम देताना त्यांच्या वेतनातून प्रचलित नियमानुसार अशंदायी भविष्य निर्वाह निधीची रक्कम कपात करण्यात यावी व त्यामध्ये महावितरण कंपनीचा वाटा समायोजित करुन एकूण रक्कम म.रा.वि.मंडळ अशंदायी भविष्य निर्वाह निधी विश्वस्त संस्थेकडे जमा करावी.

तसेच मृत कर्मचा-यांच्या अवलंबितांच्या वेतनातून कामगार राज्य विमा योजनांतर्गत १.७५टक्के रक्कम वसूल करावी व त्यामध्ये ४.७५ टक्के रक्कमेचा कंपनीचा वाटा समाविष्ट करुन ही एकत्रित रक्कम स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेत कामगार राज्य विमा महामंडळ (ESIC) यांच्या नांवावर काढलेल्या चलनाद्वारे नियमितपणे भरणा करावी.

ज्या अवलंबितांना म.रा.वि.मंडळ कर्मचारी अवलंबित विश्वस्त संस्थेमार्फत मासिक द्रव्य लाभ रु. २०००/- मिळत असल्यास व त्यांना रोजंदारीवर बाह्यस्त्रोताद्वारे काम दिल्यास त्यांना मासिक द्रव्य लाभाची रक्कम अदा करण्यात येऊ नये. याबाबतचा अभिलेखा संबंधित कार्यालयाने अद्यावत ठेवण्यात यावा.

मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी

प्रत :
क्षेत्रिय कार्यालयातील प्रेषण यादीप्रमाणे कार्यकारी अभियंता स्तरापर्यंत.